संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

# चॅम्पीयन ऑफ द चॅम्पीयन मुंबई विद्यापीठ
## मुंबई, भारती, एस.एन.डी.टी. आणि नागपूर विद्यापीठ ठरले अव्वल

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या क्रीडा संकुलावर ५ ते ९ डिसेंबर दरम्यान संपन्न झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धांच्या शेवटच्या दिवशी झालेल्या साखळी सामन्यांमध्ये चॅम्पीयन ऑफ द चॅम्पीयन प्रथम स्थानासह मुंबई विद्यापीठ ठरले, द्वितीयस्थान भारती विद्यापीठ, पुणे, तृतीय स्थान एस.एन.डी.टी., मुंबई तर चवथे स्थान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने पटकाविले. याप्रसंगी सर्व चमू आणि प्रशिक्षकांचा ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्रमुख अतिथी व्य.प. सदस्य श्री वसंत घुईखेडकर, डॉ. प्रदीप खेडकर, डॉ. प्रफुल्ल गवई, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळाचे सदस्य श्री सुनील डंबारे, पंच समितीचे अध्यक्ष श्री सतीश डफळे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे उपस्थित होते.

सत्कारानंतर प्रमुख अतिथी व्य.प. सदस्य श्री वसंत घुईखेडकर म्हणाले, कबड्डीशी माझा जिव्हाळ्याचा संबंध असून अखिल भारतीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन गेल्या चाळीस वर्षांपासून आम्ही करतो आहोत. प्रत्येकाच्या जीवनात खेळ महत्वाचा असून खेळाने आपले आयुष्य आणि आरोग्य तंदुरुस्त राहण्यास मदत होते. प्रत्येक महाविद्यालयात जास्तीतजास्त खेळ झाला पाहिजे, असा आमचा नेहमीच प्रयत्न राहीला आहे. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धांमध्ये मुंबई, भारती, एस.एन.डी.टी. आणि नागपूरने क्रमांक पटकाविला आणि अखिल भारतीय स्तरावर पश्चिम विभागाचे प्रतिनिधीत्व हे संघ करणार असून त्याठिकाणी दमदार कामगिरी करतील आणि या विभागाचा नावलौकिक वाढवतील, असा आशावाद व्यक्त करुन त्यांनी सर्व चमूतील खेळाडूंचे प्रशिक्षक व क्रीडा संचालकांचे अभिनंदन केले.

पाच दिवस चाललेल्या स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या यजमान पदाखाली ६१ संघ, ७२० खेळाडू व १२० संघ प्रशिक्षकांनी उपस्थिती दर्शविली. चार मैदानांची निर्मिती, विविध समित्यांचे गठण, संलग्नित महाविद्यालयातील १५० शारीरिक शिक्षण संचालकांचा सहभाग, अमूल्य योगदान, सहकार्य, विदर्भ कबड्डी फेडरेशन समितीच्या पंचांचे उत्कृष्ट सहकार्य आदींमुळे ही स्पर्धा विद्यापीठाला यशस्वीरित्या आयोजित करता आली, असे सांगून डॉ. अविनाश असनारे यांनी अखिल भारतीय महिला कबड्डी स्पर्धा पुढीलवर्षी फेब्रुवारी महिन्यात बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी याठिकाणी संपन्न होणार असल्याची माहिती दिली.

मुंबई विद्यापीठातर्फे डॉ. पासते, तर नागपूर विद्यापीठातर्फे डॉ. अविनाश तितरमारे यांनी उत्कृष्ट आयोजनाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी पंच आणि अधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केल्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देवून मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट मैदान तयार केल्याबद्दल शाल, श्रीफळ देवून श्री विनोद खांडे यांचा मान्यवरांनी सत्कार केला. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे संचालन डॉ. विजय पांडे यांनी, तर आभार डॉ. अविनाश असनारे यांनी मानले. यावेळी अमरावती विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, क्रीडा संचालक तसेच विविध प्राधिकारणींचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी, क्रीडाप्रेमी, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

### सकाळचे सामने

आज संपन्न झालेल्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात मुंबई विद्यापीठ संघाने नागपूर विद्यापीठाचा ३०-१९ असा ११ गुणांनी पराभव करत सामन्यासह अजिंक्यपद पटकाविले. मुंबई विद्यापीठातर्फे मेघा, समरीन, साक्षी आणि नसरीन यांनी उत्कृष्ट चढाई करत हा सामना जिंकला.

दुसऱ्या अटीतटीच्या सामन्यात भारती विद्यापीठ, पुणे संघाने एस.एन.डी.टी. मुंबई संघाचा २२-१९ असा अवघ्या ३ गुणांनी निसटता पराभव करत स्पर्धेचे उपविजेते पद पटकाविले. पुणे संघातर्फे काजल जाधव, आदिती जाधव आणि पुनम तांबे यांनी उत्कृष्ट प्रदर्शन केले.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

जनसंपर्क विभाग
दि. ०७/१२/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:Users/PRO/Desktop/University News 2019 316